# महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन

# MAHARASHTRA RAJYA MAGASVARGIYA VIDYUT KARMACHARI SANGHATAN

Affiliated to : ALL INDIA INDEPENDENT LABOUR UNION ( ILU )

(Reg.No.NGP.-1064)

| PRESIDENT | WORKING PRESIDENT | GEN. SECRETARY | CHIEF ORGANISER |
|---|---|---|---|
| **SANJAY GHODKE** | **S. K. HANWATE** | **PREMANAND MOURYA** | **Y. K. KAMBLE** |
| C-303, Ganeshan, Phase-I, Pimple-Saudagar, Behind Goldy Gym, HAWELI, PUNE-412216 | 8-A, Konark Colony, Behind Rangoli Lawn, Kathora Road AMRAVATI-444604 | Shravasti, R.S.No.15/4, Plot No.1, R.K.Nagar, Society No.1, Morewadi, Ta.Karveer, Dist.KOLHAPUR-416013 | Mahavitran Colony Class-II, Block No.1, M.I.D.C. Road, Kalmeshwar, Dist. NAGPUR-441501 |
| (M) : 7875767377 | (M) : 7875763754 | (M) : 7875420066 | (M) : 8550976766 |

**Head Office : 314, Neelkamal Complex, Mahajan Market, Main Road, Sitabuldi, Nagpur-12. ☎ : 0712-2541980**



- CHIEF ADVISER
  **J. S. Patil**
  Nagpur
- DY. GEN. SECRETARY
  **Sanjay More**
  Kalyan
  **Dineshkumar Kamble**
  Washi
  **A. P. Shinde**
  Uran
- VICE PRESIDENT
  **Madhukar Kamble**
  Mumbai
  **Kishor Ahiwale**
  Pune
  **Siddharth Patil**
  Nanded
  **C. S. Janbadkar**
  Bhandara
  **S. S. Ade**
  Bhandup
  **P. L. Helode**
  Amravati
  **N. D. Potbhare**
  Beed
  **R. S. Kamble**
  Kolhapur
  **Suresh R. Pachange**
  Jalgaon
  **A. K. Mehare**
  Chandrapur
  **Suryakant Janbandhu**
  Nashik
  **Ramesh Kamble**
  Pune
  **B. L. Wadmare**
  Parli
  **Nilesh Gajbhiye**
  Khaperkheda
- TREASURER
  **Jeevan Gaikwad**
  Koradi
- PUBLICITY SECRETARY
  **Bandu Shambharkar**
  Nagpur
- WOMAN REPRESENTATIVE
  **Smt. Nisha Choudhari**
  Bhusawal
  **Smt. Jaya Chopkar**
  Hingoli
  **Smt. Anjali Bansod**
  Mumbai


क्र.मरामाविकसं/केंद्रिय मुख्य सल्लागार/मुख्य कार्यालय/१८४ Dt.: २२-०३-२०२१

प्रति,

**मा. मुख्यमंत्री**
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई-३२

**विषय : मागासवर्गीयांची पदोन्नतीमधिल प्रतिनिधीत्वाची माहिती संकलित करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या प्रशासकीय समितीच्या कार्यकक्षेबाबत.**

**संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३६६/१६-ब, दि.२२ मार्च २०२१**
**२) संघटनेचे पत्र क्र.११२, दि.१८-०८-२०२०**
**३) संघटनेचे पत्र क्र.१२५, दि.२२-०९-२०२०**

महोदय,

पदोन्नतीमधिल आरक्षणाबाबत महाराष्ट्र शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ अंतिम निकाली निघण्यासाठी दि.२९-०९-२०२० पासून सुनावणी सुरू झाल्यानंतर न्यायालयीन आवश्यकतेनुसार **अपर्याप्त प्रतिनिधीत्व** (**Inadequency of Representation**) **व प्रशासनाची कार्यक्षमता** (**Efficiency of Administration**) याबाबतच्या आकडेवारीसाठी प्रशासकीय समितीची स्थापना करण्याची मागणी संदर्भ क्र.२ व ३ नुसार सर्वोच्च न्यायालयातील याचिकाकर्ता संघटना म्हणून महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेने महाराष्ट्र शासनाकडे सातत्याने केली होती. त्यास अनुसरून शासनातर्फे संदर्भ क्र.१नुसार प्रशासकीय समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन!

यासंदर्भात आपले लक्ष वेधण्यात येते की, सर्वोच्च न्यायालयाने एम. नागराज विरुद्ध भारत सरकार (२००६) या याचिकेवर दि.१९.१०.२००६ रोजी निर्णय देताना पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्यासाठी राज्य शासनाने **मागासलेपणा, अपर्याप्त प्रतिनिधीत्व व प्रशासनाची कार्यक्षमता** या अटींची पूर्तता करण्याचे आदेश पारित केले होते. याबाबत नवीनतम आकडेवारी शासनाने सादर न केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने पदोन्नतीमधिल आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करण्याचा दि.२५ मे २००४ चा शासनादेश रद्द केला होता.

राज्य शासनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यानंतर महाराष्ट्रासह इतर सर्व राज्यांच्या याचिकांवर एकत्रित निर्णय देताना **'जरनैल सिंग विरूद्ध लक्ष्मी नारायण गुप्ता'**, विशेष अनुमती याचिका क्र.३०६२१/२०११ यावर संविधान पिठाच्या दि.२६ सप्टेंबर २०१८ च्या निर्णयाद्वारे पदोन्नतीमधिल आरक्षण लागू करण्यासाठी **'मागासलेपणा'** सिद्ध करण्याची अट सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली आहे. सदर निर्णयाच्या परिच्छेद-२१ मध्ये **"However, the conclusion in Nagraj (Supra) that the State has to**

*पान क्र. २ वर*

# महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन

# MAHARASHTRA RAJYA MAGASVARGIYA VIDYUT KARMACHARI SANGHATAN

Affiliated to : ALL INDIA INDEPENDENT LABOUR UNION ( ILU )

(Reg.No.NGP.-1064)

PRESIDENT
**SANJAY GHODKE**
C-303, Ganeshan,
Phase-I, Pimple-Saudagar,
Behind Goldy Gym,
HAWELI, PUNE-412216
(M) : 7875767377

WORKING PRESIDENT
**S. K. HANWATE**
8-A, Konark Colony,
Behind Rangoli Lawn,
Kathora Road
AMRAVATI-444604
(M) : 7875763754

GEN. SECRETARY
**PREMANAND MOURYA**
Shravasti, R.S.No.15/4,
Plot No.1, R.K.Nagar, Society
No.1, Morewadi, Ta.Karveer,
Dist.KOLHAPUR-416013
(M) : 7875420066

CHIEF ORGANISER
**Y. K. KAMBLE**
Mahavitran Colony Class-II,
Block No.1, M.I.D.C. Road,
Kalmeshwar,
Dist. NAGPUR-441501
(M) : 8550976766

**Head Office : 314, Neelkamal Complex, Mahajan Market, Main Road, Sitabuldi, Nagpur-12. ☎ : 0712-2541980**



- CHIEF ADVISER
  **J. S. Patil** Nagpur
- DY. GEN. SECRETARY
  **Sanjay More** Kalyan
  **Dineshkumar Kamble** Washi
  **A. P. Shinde** Uran
- VICE PRESIDENT
  **Madhukar Kamble** Mumbai
  **Kishor Ahiwale** Pune
  **Siddharth Patil** Nanded
  **C. S. Janbadkar** Bhandara
  **S. S. Ade** Bhandup
  **P. L. Helode** Amravati
  **N. D. Potbhare** Beed
  **R. S. Kamble** Kolhapur
  **Suresh R. Pachange** Jalgaon
  **A. K. Mehare** Chandrapur
  **Suryakant Janbandhu** Nashik
  **Ramesh Kamble** Pune
  **B. L. Wadmare** Parli
  **Nilesh Gajbhiye** Khaperkheda
- TREASURER
  **Jeevan Gaikwad** Koradi
- PUBLICITY SECRETARY
  **Bandu Shambharkar** Nagpur
- WOMAN REPRESENTATIVE
  **Smt. Nisha Choudhari** Bhusawal
  **Smt. Jaya Chopkar** Hingoli
  **Smt. Anjali Bansod** Mumbai




collect quantifiable data showing backwardness of the Scheduled Castes and Scheduled Tribes, being contrary to the Nine-Judge bench in Indra Sawhney (I) (Supra) is held to be invalid to this extent.'', असा निर्णय देऊन **'मागासलेपणा'** सिद्ध करण्याच्या अटीला अवैध ठरविले आहे.

त्यामुळे संदर्भ क्र.१ नुसार महाराष्ट्र शासनातर्फे गठीत प्रशासकीय समितीद्वारे केवळ **'अपर्याप्त प्रतिनिधीत्व'** व **'प्रशासनाची कार्यक्षमता'** या दोनच अटींची पुर्तता करण्यासाठी आकडेवारी गोळा करण्याची आवश्यकता आहे.

तथापि, संदर्भ क्रमांक-१ मधिल शासनादेशानुसार समितीची कार्यकक्षा स्पष्ट करणाऱ्या अनुक्रमांक-२ मध्ये **'मागासवर्गीय जातींचा मागासलेपणा सिद्ध करण्यासाठी माहिती गोळा करणे'** असे नमुद करण्यात आले आहे. याबाबत आपले लक्ष वेधण्यात येते की, कर्नाटक राज्यामध्ये जेव्हा अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती रत्नप्रभा यांचे अध्यक्षतेखाली दि.२२-०३-२०१७ रोजी करण्यात आलेली प्रशासकीय समितीची स्थापना ही जरनैल सिंग संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येण्यापूर्वीची असल्याने कर्नाटक शासनाने एम. नागराज निर्णयास अनुसरून तिन्ही अटींसंदर्भात माहिती गोळा केली होती. परंतु, महाराष्ट्र शासनास आता जरनैल सिंग निर्णयास अनुसरून कार्यवाही करणे अपेक्षित असल्यामुळे मागासलेपणा सिद्ध करण्याची अट वगळून **'अपार्यप्त प्रतिनिधीत्व'** व **'प्रशासनाची कार्यक्षमता'** या दोन अटींची पूर्तता होण्याच्या दृष्टिकोणातून आकडेवारी गोळा करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय समितीच्या कार्यकक्षेमध्ये त्यानुसार सुधारणा करून या संदर्भात विहीत कालावधीत अहवाल तयार करण्याच्या दृष्टिकोणातून कार्यवाही करावी, ही विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासु,

**(जे. एस. पाटील)**
मुख्य सल्लागार

**<u>प्रत सादर</u> :**

मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन
तथा, पदोन्नतीमधिल आरक्षणासंदर्भात
निर्णय घेण्यासाठी स्थापित मंत्रीगट समितीचे अध्यक्ष,
मंत्रालय, मुंबई - ३२.